MHRG110003132017

## नियमित दिवाणी मुकदमा नं. ५0/२०१७ मधील नि.नं. ७६ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादीने वाद मिळकतीची वस्तुस्थिती कोर्टासमोर येणेकरिता कोर्ट कमिशनर नियुक्ती करीता दिलेला आहे.

**वादीचे अर्जातील कथने खालीलप्रमाणे**

२ दाव्यातील कलम १ मध्ये नमुद असलेले मिळकतीचे वर्णन '' गाव मौजे पाटणूस येथील घर मिळकत क्र. ८८ चा भाग ०१ ज्यासी एकूण क्षेत्र ४८ x ७८ व ९ x १९ (३९१५ चौ.फुट ) अशा संपुर्ण क्षेत्रात एकूण आठ खोल्या आहेत व त्यामधील दोन खोल्या ज्यासी एकूण क्षेत्र अंदाजे ९३६ स्के. फुट हे प्रतिवादीचे ताब्यात आहेत. सदर दोन खोल्या या दावा मिळकतीचा विषय असून सदर बाबतची सत्य परिस्थिती मे. न्यायालयाचे रेकॉर्डवर येणे आवश्यक आहे.

३. सदर दोन खोल्यांना चर्तुःसिमा या खालीलप्रमाणे नमूद आहेत.

पुर्वेसः – ८८ चा भाग क्र. १ मधील अन्य रुम्स

पश्चिमेसः– सचिन सदानंद म्हामुणकर यांची मिळकतीचा

दक्षिणेसः – मनोहर वामन म्हामुणकर यांची मिळकतीचा

उत्तरेसः – बाळाराम बाबाजी म्हामुणकर यांची मिळकत

सदर दाव्याचा योग्य व न्यायपुर्ण निकाल देणेकामी कोर्ट कमिशनर नेमणे

आवश्यक आहे व तसा त्यांचा रिपोर्ट मे. न्यायालयाचे रेकॉर्डवर येणे न्यायोचित व आवश्यक असल्याने कोर्ट कमिशनरची नियुक्ती करण्याची विनंती वादीने केली आहे.

**अर्जावरील प्रतिवादीचे म्हणणे खालीलप्रमाणे**

४. प्रतिवादीने नि.नं. ७९ कडे म्हणणे दाखल करुन वादीच्या सदरचे अर्जास हरकत उपस्थित केली आहे. वादीचा सदर अर्ज हा सीपीसी ऑर्डर २६ रुल ९ चे तरतुदीचे विसंगत / विरुध्द आहे व अर्ज फेटाळण्यास पात्र असल्याचे कथन केले आहे. वादीने सदरचा अर्ज हा दावा मिळकतीचे ताबा कोणाकडे आहे हे ठरविण्यासाठी व तसा पुरावा कोर्टासमोर येण्यासाठी अर्ज दिलेला आहे परंतु यासाठी कोर्ट कमिशन नेमणे हे न्यायोचित ठरणार नाही. वादीस पुरावा निर्माण करण्यासाठी कोर्ट कमिशनची नेमणूक करता येणार नाही.

५. दाव्यामध्ये दावा मिळकतीच्या ताब्यावरुन वाद आहे. वादीचे असे म्हणणे आहे की, घर मिळकत क्र. ८८ च्या भाग १ मधील पश्चिमेकडील दोन खोल्या प्रतिवादीचे ताब्यात आहेत परंतु प्रतिवादीने हे ना कबुल करुन त्याचे कैफियतीमध्ये सदर घर मिळकतीच्या भाग १ मधील पश्चिमेकडील चार खोल्या प्रतिवादीचे ताबा कब्जात असल्याचे म्हटलेले आहे. प्रतिवादीने सदर दाव्यामध्ये कांउटर क्लेम देखील या चार खोल्याबाबत दाखल केलेला आहे. सबब ताब्याबाबत वाद असेल तर कोर्ट कमिशन पुराव्यासाठी नियुक्त करणे हे न्यायोचित ठरणार नाही. सबब अर्ज फेटाळण्यास पात्र आहे.

६. सदर दावा हा आजरोजी वादीच्या अंशता पुरावासाठी आहे. वादीने दाने साक्षीदार तपासलेले आहेत. सबब दाव्याचे कामकाजास विलंब व्हावा या हेतुने सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. वादीचा सदरचा अर्ज मोघम स्वरुपाचा आहे. सदरच्या अर्जामध्ये कोर्ट कमिशनर म्हणून कोणाची नेमणुक व्हावी. याबाबत विनंती नाही. मुळातच ताबा कोणाचा आहे हे ठरविण्यासाठी कोर्ट कमिशन करता येणार नाही. वादीचा दावा हा Declaration करिता, ताबा मिळण्याकरिता व मनाई हुकुमाकरिता दाखल केलेला आहे. तसेच सदर दाव्यास Counter Claim दाखल आहे. सबब अर्ज हा कायदेशीर नाही. वादीचा दावा अतिक्रमण हटवून मिळण्याकरिता नाही. सबब केवळ पुरावा गोळा निर्माण करण्याकरिता सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. सबब अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे.

७. दोन्ही पक्षाच्या सुविद्य वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

८. वादीने प्रस्तुतचा दावा ताबा मिळणेसाठी, निरंतर मनाईसाठी व ठराव करुन मिळणेबाबत दाखल केलेला आहे. प्रस्तुतच्या अर्जातील वादीचे कथनांनप्रमाणे मौजे पाटणूस येथील घर मिळकत क्र. ८८ चा भाग ०१ ज्यासी एकूण क्षेत्र ४८ x ७८ व ९ x १९ (३९१५ चौ.फुट ) अशा संपुर्ण क्षेत्रात एकूण आठ खोल्या आहेत व त्यामधील दोन खोल्या ज्यासी एकूण क्षेत्र अंदाजे ९३६ स्के. फुट हे प्रतिवादीचे ताब्यात आहेत. प्रतिवादीने सदरची बाब नाकारलेली आहे. प्रस्तुतचा अर्ज व म्हणणे विचारात घेता असे

दिसून येते की, वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये वाद मिळकतीच्या ताब्यावरुन वाद आहेत. प्रस्तुतच्या अर्जाचे अवलोकनावरुन असे दिसून येते की, वाद मिळकत असलेल्या दोन खोल्या प्रतिवादीच्या ताब्यात आहेत व त्याबाबतची परिस्थिती न्यायालयासमोर आणण्याकरिता कोर्ट कमिशनरची नियुक्ती करण्याची मागणी वादींने केलेली आहे. प्रतिवादीने दाव्यास म्हणणे व प्रतीदावा दाखल करुन घर मिळकतीच्या भाग १ मधील पश्चिमेकडील चार खोल्या प्रतिवादीच्या ताब्यात असल्याचे कथन केलेले आहे. यावरुन वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये वाद मिळकतीच्या ताब्यावरुन वाद असल्याचे स्पष्ट होते. वादीच्या कथनांनप्रमाणे प्रतिवादी हा वाद मिळकतीच्या (दोन खोल्या) ताब्यात आहेत ही बाब वादी मौखीक तसेच इतर कागदोपत्री पुराव्यावरुन सिध्द करु शकते. अशा परिस्थितीत कोर्ट कमिशनर यांची नेमणूक केल्यास ते न्यायालयामार्फत पुरावा गोळा केले सारखे होईल. सबब प्रस्तुतचा अर्ज नामंजुर होण्यास पात्र आहे.

## —: आदेश :—

प्रस्तुतचा अर्ज खर्चासह नामंजुर करणेत येतो.

दिनांक : १८/११/२०२४ (एम.एस. पठारे )

२ रे सह दिवाणी न्यायाधिश (क.स्तर), माणगांव